# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १२/७/२००६ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०७) इतिवृत्त

**बुधवार** दिनांक **१२ जुलै २००६** रोजी मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गायकवाड दिलीप नारायण
3. श्री. रविकांत काशीनाथ गवळी
4. श्री. मुजीब आलमशाह खान
5. सौ. दलाल लता श्रीनिवास
6. श्री. संजय पांडुरंग शिरसाट
7. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
8. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
9. श्री. मो. जावेद मो. इसाक
10. श्री. सावंत मधुकर दामोधर

**संवाद :**

श्री. रविकांत गवळी : दिनांक 11जुलै रोजी मुंबई येथील लोकल रेल्वेमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात अनेक निष्पात नागरीकांचा बळी गेला व अनेक जण जखमी झाले ही लोकशाहीला काळीमा फासणारी घटना आहे. असे कृत्य करणाऱ्यांचा तीव्र निषेध केला पाहिजे. या दुर्घटनेमध्ये ज्या निष्पाप नागरीकांचे प्राण गेले त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

सौ. लता दलाल : मुंबई मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाच्या दुर्दैवी घटनेत बळी पडलेल्या निष्पाप नागरीकांना सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहण्यात यावी. तसेच या घटनेचा तीव्र निषेध करण्यात यावा व आजची सभा तहकूब करावी.

(या वेळी सभागृहात सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून मुंबईतील बॉम्बस्फोटाच्या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या लोकांना श्रध्दांजली अर्पण केली.)

मा. सभापती : श्रध्दांजली नंतरआजची सभा तहकूब करण्यात येते.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद